पुढील चार वर्षात देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 2

कोण देव, कोण दानव हे लोक ठरवतात : आ. विजय वडेट्टीवार >> पान 3

राज्य महामार्गावरील खड्ड्यात धानाची लागवड >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ




देशभक्तीवर आधारित काजोल - पृथ्वीराज सुकुमारन स्टारर सरझमीन ओटीटीवर रिलीज

आतील पान

**सुविचार**

आपल्या क्षमता ओळखा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 09 ■ सोमवार, दि. 28 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# २० वर्षांनंतर राज ठाकरे हे मातोश्रीवर दाखल; राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना मातोश्रीवर भेट देत शुभेच्छा दिल्या

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दोन दशकांनंतर मातोश्रीवर आलेल्या राज ठाकरे यांच्या भेटीची आणि दोन्ही ठाकरे बंधूच्या मनोमिलनाची चर्चा रंगली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा आज ६५ वा वाढदिवस आहे. यंदाचा वाढदिवस त्यांच्यासाठी खूप खास ठरता त्याला कारण ठरले ते त्यांच्या भाऊ राज ठाकरे.





मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. राज ठाकरेंच्या भेटीवर उद्धव ठाकरे आपली प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरे यांच्या भेटीनंतर उद्धव ठाकरे यांनी एका शब्दात सांगितले भविष्यकाळ कसा असेल? उद्धव ठाकरे यांनी नेमकं काय म्हटलं ते जाणून घेऊयात.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंची भेट घेतली. उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसा. त्यानिमित्तानं राज ठाकरे मातोश्रीवर गेले आणि त्यांनी उद्धव ठाकरेंची भेट घेऊन त्यांना वाढदवसांच्या शुभेच्छा दिल्या. राज ठाकरे मातोश्रीवर जाणे हा अनेक अर्थानी ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. राज ठाकरे हे शिवसेनेत असताना अनेकदा मातोश्रीवर जायचे. लहानपणापासून ते बाळासाहेब ठाकरेंच्या सोबतच राहिले. बाळासाहेब ठाकरेंच्या सहवासात राज ठाकरेंची जडणघडण झाली. मात्र, शिवसेना सोडल्यानंतर राज ठाकरे आणि मातोश्रीची ताटातूट झाली होती. शिवसेना सोडल्यानंतर आणि बाळासाहेबांच्या निधनानंतर राज ठाकरे आज पहिल्यांदाच राज मातोश्रीवर दाखल झाले.

शिवसेना सोडल्यानंतर राज ठाकरे हे जेव्हा जेव्हा मातोश्रीवर गेले होते, तेव्हा काहीतरी अपरिहार्य कारण होते. मात्र, आता राज ठाकरे हे पहिल्यांदाच स्वखुशीने मातोश्रीवर गेले आहेत. या भेटीमुळे मराठी जनेमध्ये पुन्हा उत्साह संचारला आहे. इतच नाही तर हा महाराष्ट्रातील राजकारणाच्या नव्या अध्यायाचा श्रीगणेशा ठरण्याचीही शक्यता आहे. राज ठाकरेंच्या भेटीनतर उद्धव ठाकरे यांनी प्रतित्रिया दिली आहे. राज ठाकरे वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आल्याने कित्येक पटीनं आनंद झाला अशी भावना, उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली. आपला आनंद द्विगुणित झाला आहे. ज्या घरात एकत्र आलो तिथे आम्ही एकत्र भेटलो यामुळे आनंद वाटत असल्याची प्रतिक्रिया उद्धव यांनी राज भेटीवर दिली.

नक्कीच पुढचा सर्व काळ चांगला होईल. आम्ही अनेक वर्षानी भेटलो. ज्या घरात वाढलो तिथे भेटलो. ज्यांनी आम्हाला वाढवलं त्यांच्या खोलीत गेलो. आज बऱ्याच वर्षाने राजने घरी येऊन शुभेच्छा दिल्या. आपल्या भाषेत द्विगुणीत शब्द आहे. पण त्या पेक्षा कित्येक पटीने हा आनंद मोठा आहे असे विधान उद्धव ठाकरेंनी केलं आहे. दोन भाऊ एकत्र येत असतील तर आम्हाला आनंदच आहे. वसुधैव कुटुंबकम ही आपली परंपरा आहे, अशी प्रतिक्रिया प्रविण दरेकर यांनी राज आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्यावर केलीये. दोन भाऊ भेटले म्हणून आमच्या पोटात दुखण्याचं काही कारण नाही, असंही दरेकर म्हणालेत.

## मुसळधार पावसामुळे अनेक शेती पाण्याखाली



**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यात गेल्या तीन दिवसापासून मुसळधार पाऊस पडला आज मात्र पावसाने उसंती घेतली असली तरी मात्र गोंदिया जिल्ह्यातील अनेक रोड रस्ते हे पुलावरून पाणी वाहत असल्याने बंद आहेत, अनेक भागात शेत हे पाण्याखाली आल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले, तर शेतीला तड्याचे स्वरूप सुद्धा आले आहे. शेतकऱ्यांनी लावलेले धान पीक हे पाण्याखाली आल्यानंतर तर संपूर्ण धान पीक सडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकरी पुन्हा कर्जबारी होण्याच्या मार्गावर आहेत. तर शासनाने लवकरात लवकर पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी अशी मागणी आता शेतकरी करत आहेत.

## जिल्हा परिषद शाळेच्या पिण्याच्या टाकीत कलर टाकल्याने अज्ञात व्यक्तीविरुद्ध ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल



**जळगाव/प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यातील लासुर येथे जिल्हा परिषदेच्या मुलींच्या शाळेत पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कलर टाकल्याने कलरच पाणी प्यायल्याने मुलींच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असता, परंतु वेळेत लक्षात आल्याने सदर पाण्याचे नमुने आरोग्य विभागाने तपासणीसाठी घेतलेले आहे व घटनास्थळी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षण अनिल भवारी व कर्मचारी यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी व शाळेतील कर्मचारी उपस्थित होते. सदर घटने संदर्भात चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशनला अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांनी सांगितले.

## भुयारी रेल्वे पुलात साचलं पावसाचं पाणी, नागरिकांचे हाल



**जालना/प्रतिनिधी :** जालन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पावसाचे पाणी आता थेट रेल्वे स्थानकाच्या बाजूला असलेल्या भुयारी रेल्वे पुलात शिरले आहे. साचलेलं पाणी थेट कमरेपर्यंत जात असल्याने दुचाकी चालकांचे हाल होतायत. दुचाकी या भुयारी मार्गातून जाताना दुचाकीच्या इंजीनमध्ये पाणी शिरत असल्याने दुचाकी बंद पडतायत. या प्रकारामुळे दुचाकी चालकांचे हाल होत आहेत. तर अपंगांना देखील या भुयारी मार्गातून त्रास सहन करावा लागतोय. या भुयारी उड्डाणपूलातून जाण्यासाठी नागरिकांना तासंतास वाट बघावी लागतेय. दुसरीकडे या भुयारी मार्गात साचलेलं पाणी मोटारीने काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मात्र, अजूनही नागरिक त्रस्त आहेत.

## मनसा देवी मंदिरात चेंगराचेंगरी; सहा जणांचा मृत्यू, दुर्घटनेचं कारण आलं समोर

**हरिद्वार :** संपूर्ण देशात चारधाम यात्रेमुळे प्रसिद्ध झालेल्या हरिद्वारमधील मंदिरात चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली आहे. शहरातील मानसा देवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला. तर अनेक भाविक जखमी झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. कोतवाली प्रभारी रितेश शाह यांनी मानसा देवी मंदिरातील चेंगराचेंगरीच्या घटनेची पुष्टी केली आहे. दुर्घटनेनंतर पोलीस आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचले आहे. गढवालचे आयुक्त विनय शंकर पांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार दुर्घटनेत ३५ जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढू शकतो. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

## राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांची भेट ही आनंदाची गोष्ट; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उद्धव ठाकरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट ही आनंदाची गोष्ट आहे. याकडे राजकीय दृष्टिकोनातून कशाला पहायचे. आमच्याही शुभेच्छा आहे. उद्धव ठाकरे यांना जन्मदिवसाच्या शुभेच्छा द्यायला जाण्याच्याकडे राजकारणातून पाहु नये, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या भेटीवर प्रतिक्रिया देताना माध्यमांशी व्यक्त केले.

यावेळी माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्राच्या मनात काय आहे. हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसले आहे. महाराष्ट्राच्या मनात काय आहे. हे तुम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल. आता काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे. काही पक्षाच्या नेत्यांच्या मनात जे आहे ते महाराष्ट्राच्या मनातील आहे, असं म्हणणं योग्य नाही. ते फार मोठे स्टेटमेंट होईल.अशा प्रकारे पत्र लिहून कोणी वाद निर्माण करू नये. मंत्र्यांनी आपसात बोलावे. आणि त्यांना काही अडचणी असेल तर त्यांनी मला येऊन सांगावे. म्हणजे त्याच्यातील अडचणी दूर करता येईल. मंत्री आणि राज्यमंत्री हे दोघे शासनाचे भाग असतात. मंत्री जे अधिकार देतात ते राज्यमंत्र्यांचे अधिकार असतात.



त्यामुळे याच्यात कुठलंच कन्फ्युजन नाही. मात्र, राज्य मंत्र्यांना बैठका घेण्याचा अधिकार नाही, असं मानणे चुकीच आहे. राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा अधिकार आहे. पण काही धोरणात्मक निर्णय असतील तर ते मंत्र्यांशी बोलल्याशिवाय घेता येत नाही. मंत्र्यांची मान्यता घ्यावी लागते. मंत्री आणि राज्यमंत्री दोघांनी सामंजस्य दाखवल पाहिजे. काही अडचण असेल माझ्याशी बोलल पाहिजे. असे मतही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसन व्यक्त केले.

पुणे पोलीस कारवाई याबाबत मला माध्यमातून माहिती मिळाली आहे. याबाबत अजून ब्रीफिंग घेता आलेलं नाही. एक रेव्ह पार्टी बस्ट केलेली आहे. त्यामध्ये काही लोक सापडले आहे. ड्रग्ज वगैरे सापडले आहे. त्याबाबत ब्रीफिंग घेईल. प्राथमिक दृष्ट्या असा गुन्हा घडल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## राज ठाकरे उद्धव ठाकरे यांच्याकडे गेले यात काही नवल नाही : छगन भुजबळ

**नाशिक /प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज ठाकरे हे उद्धव ठाकरे यांच्याकडे गेले असते यात काही नवल नाही अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

त्यावेळी ते म्हणाले की, उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस आहे, मी सुद्धा त्यांना शुभेच्छा देतो. उदंड आणि निरोगी आयुष्य त्यांना लाभो. राज ठाकरे उद्धव ठाकरे यांच्याकडे गेले. यात काही नवल वाटत नाही ते चुलत भाऊ आहेत. राज ठाकरे उद्धव ठाकरेंना दादू म्हणायचा.राजकिय कारणामुळे ते भाऊ दूर झाले. वाढदिवसाच्या निमित्ताने एकत्र येत असतील तर वाईट वाटायचे कारण नाही.आपण सुद्धा शुभेच्छा दिल्या पाहिजे असे मत मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



## खडसेंनी जावई बापुंना अलर्ट केले पाहिजे होतं

### गिरीश महाजन यांची माध्यमांशी बोलताना माहिती

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** खडसे जावई रेव्ह पार्टीबाबत माझ्याकडे याबाबत माहिती नाही.मी काल पंढरपूर ला होतो. रात्री उशिरा मी नाशिकला आलो. एकनाथ खडसे यांचे जावई रेव्ह पार्टी मध्ये होते ही बातमी मी टीव्ही वर पाहिली. मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ मिळाले आहेत. एकनाथ खडसे यांनी कालच चाळीसगाव मध्ये मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ कुठून येतात असा सवाल मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला. यावेळी ते म्हणाले की, आज त्यांचे जावई अमली पदार्थ सह रेव्ह पार्टी करताना सापडले असून पोलीस चौकशी करत आहेत.पार्टी सुरू होती आणि या पार्टीत किती महिला होत्या आणि किती पळाले याबाबत मला माहिती नाही.खडसे यांनी जावई बापुंना अलर्ट केले पाहिजे होत. याबत चौकशी होईल. प्रत्येक वेळी आपल्या सोबत षडयंत्र कस होतं.

जावई लहान मुलगा नाही की, त्याला रात्री उचलून नेऊन तिथे बसवण्यात आले. निश्चित असं झाले असेल तर त्यांच्ययकडून वसूल केले पाहिजे.पुरुषांनी जर लाभ घेतला असेल तर चौकशी केली पाहिजे. लाडकी बहीण मुळे जरा तिजोरीवर तान आलंय हे खरं आहे. माणिकराव कोकाटे यांना मंगळवारी अजित पवार यांनी बोलावले आहे. त्यांच्या सोबत ते चर्चा करतील आणि काय झाले ते पाहतील. आज मोठ्या प्रमाणात भाजपात पक्ष प्रवेश होणार आहेत. नाशिक सह उत्तर महाराष्ट्रातील नेते आज भाजपात येणार आहेत.अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## 'महा स्माईल्स' मोहिमेमुळे विदर्भातील निष्पाप चेहऱ्यांवर पुन्हा फुलणार हसू...

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील पुढाकाराने शक्य

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बालकांच्या चेहऱ्यावरील दुभंगलेले ओठ (क्लेफ्ट) व फाटलेले टाळू (पॅलेट) या जन्मजात विकारावर उपचार आणि जनजागृती करून या बालकांच्या निरागस चेहऱ्यावर हसू फुलविणे, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ध्येय आहे. यासाठी त्यांनी विदर्भातील अशा बालकांवर उपचार आणि जनजागृतीची गरज ओळखत त्यांनी स्वयंसेवी संस्थांना आवाहन केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या आवाहनाला 'स्माईल ट्रेन इंडिया' ही स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्वच्या शेफाली बजाज यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे हे स्वप्न आता मिशनमोडवर साकार होतांना दिसत आहे.

'स्माईल ट्रेन इंडिया' ही आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्व यांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून आता ही मोहीम पूर्णपणे मोफत राबविली जाणार आहे. 'महा स्माईल्स क्लेफ्ट जनजागृती आणि उपचार मोहीम' ही केवळ वैद्यकीय मोहीम नसून, हजारो बालकांना नवजीवन देणारी एक आशावादी चळवळ ठरणार आहे. या आगळ्यावेगळ्या मोहिमेचा नागपूर येथे ३१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत स्वामी विवेकांनद मेडिकल मिशन हॉस्पिटल, खापरी, येथून शुभारंभ होणार आहे.

या पहिल्यावहिल्या उपक्रमाअंतर्गत पुढील ९० दिवसांत तीन विशेष मोबाईल व्हॅन विदर्भातील संपूर्ण ११ जिल्ह्यात फिरून लोकांमध्ये क्लेफ्ट विकाराविषयी माहिती देणार आहेत. यामध्ये लवकर निदान, उपचाराची शिफारस आणि गरजू बालकांसाठी मोफत शस्त्रक्रियांची नोंदणी असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या बालकांवर नागपूर, गोंदिया, अकोला, वर्धा येथील रूग्णालयात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

क्लेफ्ट विकार हा जन्मजात असून यात ओठ आणि टाळू हे दुभंगलेले असतात. जवळपास ७०० मुलांपैकी एका मुलांमध्ये हा विकार दिसून येतो. यावर शस्त्रक्रिया करूनच हा विकास दूर करता येते. वेळीच उपचार केले नाहीत तर कान बधिर होणे, बोलण्यात अडथळा येणे अशा वेगवेगळ्या व्यंगासोबत सामाजिक एकटेपणा येऊ शकतो. तथापि या विकारावर उपचार असून ६-७ शस्त्रक्रियेनंतर यावर पूर्णपणे मात करता येते. या सर्व शस्त्रक्रिया खर्चिक असल्याने आर्थिक दुर्बल कुटुंबातील



व्यक्तींना ते परवडणारे नाही. म्हणूनच संवेदशील नेतृत्व असलेल्या मुख्यमंत्र्यांनी क्लेफ्ट वरील उपचार संपूर्ण मोफत व्हावे, यासाठी या विशेष मोहिमेचे आयोजन केले आहे.

क्लेफ्ट विकार असलेल्या बालकांना वेळेवर उपचार मिळाल्यास त्यांचे जीवन पूर्णतः सामान्य होऊ शकते. यासाठी केवळ उपचारच नव्हे, तर जागरूकता ही देखील तितकीच गरजेची आहे. त्यामुळे 'महा स्माईल्स' ही मोहीम विदर्भातील बालकांसाठी आरोग्यदूत ठरणारी आहे. या मोहिमेमुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील हजारो कुटुंबांना एक नवीन आशेचा किरण दिसणार आहे. अपूर्ण माहितीमुळे दुर्लक्षित राहिलेल्या समस्येवर आता तज्ज्ञांच्या मदतीने प्रभावी उपचार मिळणार आहे.

स्माईल ट्रेन आणि बजाज फिनसर्व यांच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या ११ जिल्ह्यातील मुलांमध्ये जन्मजात आलेले दुभंगलेले होठ आणि टाळू विकार दूर होऊन त्यांच्या जीवनात आशेचा किरण नक्कीच जागणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

## आता थायलंड - कंबोडिया यांच्यात लष्करी संघर्ष

संपूर्ण जग सध्या युद्धाच्या खाईत लोटले आहे. आशिया, युरोप, अमेरिका सर्वच खंडात कोणत्या ना कोणत्या देशात युद्ध चालू आहे. रशिया युक्रेन युद्ध दोन वर्ष झाली तरी चालूच आहे. इस्त्राईल हा देश तर सतत वार मोडवर असतो. कधी पॅलेस्टाईन कधी कधी हमास, कधी जॉर्डन तर कधी इराण या देशांशी इस्त्राईलचे युद्ध सुरूच असते. मागील वर्षी अझरबैजान आणि अल्बेनिया या देशात युद्ध झाले होते. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धाचा भडका उडाला होता. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेले ऑपरेशन सिंदूरने तर संपूर्ण जगाची चिंता वाढवली होती. भारत आणि चीन यांच्यात १९६२ पासून तणाव आहे. चीन आणि तैवान यांच्यातही कायम तणाव असतो या दोन्ही देशात कधीही युद्धाला तोंड फुटेल अशी शक्यता असते. दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया यांच्यातही तीच परिस्थिती असते आता त्यात आणखी एका युद्धाची भर पडली आहे आणि हे युद्धही आशिया खंडातील दोन देशातच सुरू झाले आहे. विशेष म्हणजे ही दोन्ही देश भारताचे सख्खे शेजारी नसले तरी शेजारी आहेत. भारताचा शेजारी असलेल्या म्यानमार या देशाच्या पलिकडे हे देश आहेत. आशिया खंडातील महत्वाचे असणाऱ्या कंबोडिया आणि थायलंड या देशात सध्या मोठा लष्करी संघर्ष सुरू आहे. या दोन्ही देशातील तणाव शिगेला पोहचला असून दोन्ही देशातील सैन्यामध्ये सीमेवर तुफान गोळीबार चालू असून त्यात आतापर्यंत दोन्ही बाजूंनी ३३ सैनिकांचा बळी गेला असून शेकडो सैनिक जखमी झाले आहेत. सोमवारी या संघर्षास सुरुवात झाली पहिल्याच दिवशी दोन्ही बाजूंचे ११ नागरिक गोळीबारात मारले गेले. थायलंडने गोळीबारास सुरुवात केल्याचा आरोप कंबोडियाने केला तर कंबोडियाने प्रथम गोळीबारास सुरुवात केल्याचा आरोप थायलंडने केला आहे. दोन्ही देश एकमेकांवर आरोप करीत असले तरी दोन्ही देश या युद्धास पूर्वी पासून सज्ज होते फक्त त्यांना युद्धास निमित्त हवे होते ते निमित्त त्यांना सोमवारी मिळाले. सोमवारी सीमेवर गोळीबार झाला आणि युद्धाला तोंड फुटले. मिळालेल्या माहितीनुसार रॉयल कंबोडियन आर्मीने सीमेवर ड्रोन तैनात केले होते. त्यांनी तोफ आणि लांब पल्ल्याच्या बीएम - २१ रॉकेटने गोळीबार केला त्याला थायलंडने चोख प्रतिउत्तर दिले. गोळीबाराने सुरू झालेला हा संघर्ष आता उग्र स्वरूप धारण करत आहे. या युद्धात ड्रोन, रॉकेट, फायटर विमान, तोफा यांचा वापर होत आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या लष्करी तळांवर हल्ला केला जात आहे. हा लष्करी संघर्ष लवकरात लवकर संपावा अशी जगाची इच्छा आहे. भारतानेही तसे बोलून दाखवले आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशात प्रवास करण्याचे टाळावे असे आव्हान भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने केले आहे. अमेरिकेने नेहमीप्रमाणे या युद्धात नाक खुपसले आहे. स्वतःला आंतरराष्ट्रीय तंटामुक्ती संघटनेचे अध्यक्ष म्हणवून घेणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांनी लवकरात लवकर हा संघर्ष थांबवावा नाही तर अमेरिका या दोन्ही देशांशी होणारा व्यापार थांबवेल असा दम दिला आहे. मात्र सद्यस्थितीत दोन्ही देश ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. दोन्ही देश एकमेकांवर हल्ला करतच आहेत त्यामुळे हा संघर्ष आणखी वाढेल अशीच शक्यता आहे. थायलंड आणि कंबोडिया या दोन्ही देशातील वाद हा आताच नाही अनेक दशकांपासून सुरू आहे. प्रिह विहार नावाचे एक मंदिर या दोन्ही देशांच्या सीमेवर आहे. या मंदिराच्या मालकी मालकी हक्कावरून दोन्ही देशांमध्ये तीव्र मतभेद आहेत. हे मंदिर आपल्याच प्रदेशात आहे असा दावा दोन्ही देशांचा आहे त्यावरून २००८ आणि २०११ साली या दोन्ही देशात असाच संघर्ष झाला होता. आता पुन्हा त्याच कारणाने या दोन्ही देशात संघर्ष सुरू आहे. या वर्षीच्या मे महिन्यात एका कंबोडियन सैनिकाला गोळ्या घालून ठार करण्यात आले होते तेंव्हा देखील असाच मोठा तणाव निर्माण झाला होता. तेंव्हाच या दोन्ही देशात युद्ध पेटेल अशी शक्यता जाणकारांनी वर्तवली होती. सुदैवाने तेंव्हा तो संघर्ष टळला आता मात्र हा संघर्ष टळू शकला नाही आणि अखेर युद्धाला तोंड फुटले.

# पुढील चार वर्षात देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करु : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### सिकलसेल, थॅलेसिमिया, ॲनिमियावरील उपचारासाठी नवीन योजना तयार करणार
### स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे उद्घाटन
### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** प्राथमिक आरोग्य सुविधांच्या दृष्टीने प्रत्येक तीन किलोमीटरमध्ये आरोग्यसेवांचे जाळे निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या चार वर्षांत देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. येत्या काळात सिकलसेल, थॅलेसिमिया, ॲनिमियावरील महागड्या उपचारासाठी एक नवीन योजना तयार करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

लष्करीबाग येथील कमाल चौकात स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी अध्यक्षस्थानी तर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेच्या अध्यक्ष कांचनताई गडकरी यांची विशेष उपस्थिती होती. आमदार संदीप जोशी, आमदार प्रवीण दटके, आमदार आशीष देशमुख, बेंगलुरू येथील महाबोधी सोसायटीचे महासचिव पुज्य भंते आनंद थेरा, नागपूर येथील रामकृष्ण मठाचे अध्यक्ष राघवेंद्र स्वामी, माजी मंत्री अड. सुलेखा कुंभारे, राजेश लोया, विशाखापट्टणम येथील एएमटीझेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जितेंद्र शर्मा,माजी महापौर दयाशंकर तिवारी, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, माजी आमदार गिरीश व्यास, माजी आमदार टेकचंद सावरकर आदी मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आरोग्याच्या क्षेत्रात सेवेसोबतच संवेदनेलाही तेवढेच महत्त्व आहे. नितीनजीकडे सेवा आणि संवेदना या दोन्ही गोष्टी आहेत. त्यामुळेच आईच्या नावाने डायग्नोस्टिक सेंटर सुरू करून गरिबांची सेवा करण्याचा विचार त्यांनी केला आणि तो प्रत्यक्षातही उतरवला. हे केंद्र आरोग्य सेवेच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.



### डायग्नोस्टिक सेंटर हे व्यवसायाचे नव्हे तर सेवेचे माध्यम : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

समाजातील वंचितांची, शेवटच्याच्या माणसाची सेवा करण्याचे, त्यांचे जीवन सुसह्य करण्याचा अंत्योदयाचा विचार पं. दीनदयाल उपाध्याय यांनी दिला. त्या मार्गावर सातत्याने कार्य करीत आहे. राष्ट्रकारण, समाजकारण आणि सेवाकारण, हाच राजकारणाचा खरा अर्थ आहे. त्यामुळे आपल्या कार्यातून गरिबांचे जीवन कसे बदलू शकतो, याचा विचार मी करत असतो. त्याच प्रेरणेतून अनेकांच्या सहकार्याने स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरची स्थापना होऊ शकली आहे. ज्या आईने जन्म दिला तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकलो याचे समाधान आहे, अशी भावना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली व्यक्त केली. हे केंद्र व्यवसायाचे नव्हे तर सेवेचे माध्यम आहे, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

### स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरची वैशिष्ट्ये

* ६००० चौरस फूटांचे बांधकाम
* वेटिंग एरियासह संपूर्ण वातानुकूलित यंत्रणा
* पूर्णपणे पेपरलेस कार्यप्रणाली
* उच्च क्षमतेचे सर्व्हर्स
* तांत्रिकदृष्ट्या पात्र व प्रशिक्षित कर्मचारी

**– एमआरआय** (MRI)

* मेड इन इंडिया मशिन्स
* १.५ टेस्ला हाय-एंड इमेजिंग, १६ चॅनल
* MUSIC तंत्रज्ञानामुळे जलद स्कॅन शक्य, इमेज क्वालिटीमध्ये कोणतीही तडजोड नाही

**– सीटी स्कॅन** (CT Scan)

* मेड इन इंडिया मशिन्स
* मोठी शरीरयष्टी असलेल्या रुग्णांसाठी मोठे बोअर
* कमी वेळात स्कॅन संपूर्ण छातीचे स्कॅन फक्त ६ सेकंदांत

BIS, AERB, CDSCO मान्यताप्राप्त

**– डिजिटल एक्स-रे** (Digital X-Ray)


* उच्च दर्जाची डिजिटल एक्स-रे सेवा
* डायलिसिस (Dialysis)
* ५ उच्च दर्जाच्या डायलिसिस मशिन्स

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, स्व. भानुताई गडकरी यांच्याकडून नितीनजींना समाजकार्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळेच ते देशात मोठ्या प्रमाणात काम करू शकत आहेत. समाजातील शेवटच्या व्यक्तीचे कल्याण हा नितीनजींच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. उपेक्षितांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ते सातत्याने काम करीत आहेत. उद्योग, कृषी, आरोग्य क्षेत्रात त्यांचे विशेष कार्य आहे. याच मालिकेत डायग्नोस्टिक सेंटरचा समावेश होतो. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात हे खूप मोठे पाऊल असल्याचे ते म्हणाले.एकीकडे वैद्यकीय क्षेत्रात विकसित तंत्रज्ञानाचा वापर वाढला असताना सेवांचे शुल्क देखील जास्त आहे. अशात एमआरआय आणि सिटी स्कॅनच्या मशीन्स भारतीय बनावटीच्या असतील तर सेवांचे शुल्क देखील कमी राहील. त्याचवेळी भविष्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हॉस्पिटल्सची संख्या वाढवावी लागणार आहे. आरोग्य क्षेत्रात काम करीत असताना सेवाभाव आणि संवेदना ह्या गोष्टी आवश्यक असतात. पुढील चार वर्षात देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात येणार असून सिकलसेल, थॅलेसिमिया, ॲनिमियावरील उपचारासाठी नवीन योजना तयार करणार असल्याचे ते म्हणाले.

## शौचालय चालकाला मारहाण प्रकरणी मनसेच्या पाच पदाधिकाऱ्यांना अटक

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड शहरातील बस स्थानकातील शौचालय चालकाला मराठीच्या मुद्द्यावरुन मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी चोप दिला होता. या प्रकरणी उत्तरभारतीय शौचालय चालक अमरेश झा याच्या तक्रारी वरुन वजीराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आज मनसेच्या पाच पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी अटक देखील केली. लघुशंकेसाठी महिलांकडून हा शौचालय चालक पाच रुपये आकारत होता. याचा जाब विचारणाऱ्या मनसे कार्यकर्त्यांसोबत त्याचा वाद झाला. मराठीत बोलणार नाही, काय करायचं करा... असं



आव्हान अमरेश झा याने दिल्याने त्याला चोप देऊन मनसेने माफी मागायला लावली होती. या प्रकरणात वजिराबाद पोलिसांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांविरोधात कारवाई केली.

## देशभक्तीवर आधारित काजोल - पृथ्वीराज सुकुमारन स्टारर सरझमीन ओटीटीवर रिलीज

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री काजोल, पृथ्वीराज सुकुमारन आणि इब्राहिम अली खान यांच्या प्रमुख भूमिका असलेला सरझमीन हा चित्रपट २५ जुलै रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म जिओसिनेमावर प्रदर्शित झाला आहे. हा चित्रपट देशभक्तीवर आधारित आहे. सरझमीन चित्रपटामध्ये एका सैनिकाला आपल्या मुलाची किंवा देशाची निवड करायची असते. या चित्रपटामध्ये पृथ्वीराज सुकुमारन हा कर्नल विजय मेननची भूमिका साकारत आहे, जो कश्मीरमध्ये राहतो. तसेच इब्राहिम अली खाननं चित्रपटामध्ये हरमनची भूमिका साकारली असून तो कर्नल विजय मेननचा मुलगा आहे. याशिवाय चित्रपटात काजोलनं विजय मेननच्या पत्नीची भूमिका केली आहे.

काजोल आणि पृथ्वीराज सुकुमारन यांचा सरझमीन चित्रपट रिलीज : चित्रपटामध्ये हरमनला आपल्या वडिलांचे प्रेम हवे असते, मात्र काही गैरसमजमुळं हरमन हा आपल्या वडिलांचा द्वेष करू लागतो. यानंतर हरमन हा असा मार्ग निवडतो, जो त्याच्या वडिलांच्या आणि देशाच्या विरोधात जातो. हा चित्रपट खूप मनोरंजक आहे. पृथ्वीराज सुकुमारन आणि काजोल यांनी पहिल्यांदा एकत्र स्क्रिन शेअर केली आहे. दरम्यान या चित्रपटात काश्मीरच्या सुंदर दऱ्या दाखविण्यात आल्या आहेत. या चित्रपटातील अनेक दृष्य मिशन काश्मीर आणि फिजा सारख्या जुन्या चित्रपटांची आठवण करून देते. सरझमीन चित्रपटात काही ॲक्शन सीन्स आणि व्हीएफएक्स असल्यानं हा चित्रपट आणखीच दमदार वाटतो.

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृतिदिनानिमित्त दिग्रस येथे अभिवादन

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अयाज काजी**

**दिग्रस :** भारताचे माजी राष्ट्रपती, शास्त्रज्ञ, आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त डॉ. अब्दुल कलाम फोरम, दिग्रस यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी दिग्रस पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे, तसेच पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दिग्रस शहरातील माजी नगराध्यक्ष विजयकुमार बंग, रवींद्र अरगडे, माजी नप उपाध्यक्ष जावेद पटेल, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष महादेवराव सुपारे, डॉ कलाम फोरमचे संस्थापक मिर्जा अफजल बेग, जिल्हा नियोजन समिती माजी सदस्य सुधीर देशमुख, पंचायत समिती माजी सभापती मिलिंद मानकर, माजी सभापती नप दीपक वानखडे, सैय्यद अक्रम, बाबुसिंग जाधव, जावेद परसुवाले, एल पी राठोड, फारुक अहेमद, तस्लिम पढेवाले, ज्येष्ठ शिव सैनिक पुनम पटेल, हरीश सांखला, भीमराव खारोडे, राहुल देशपांडे, स्वप्नील दुधे, रोशन शेख, अन्वर धोंगडे, वजीर कोथमिरे, सरपंच देऊरवाडा नितीन इंगोले, पोलिस पाटील जिंतूरकर, संजय हारके, दत्ता वानखडे, भाजपा शहराध्यक्ष अभय इंगळे, संदीप झाडे, तालुका काँग्रेस कमिटीचे शंकर जाधव, अरबाज धारिवाला, फैय्याज मलनस, राष्ट्रवादी काँग्रेसचे भारत पाटील, अरुणावती प्रकल्प कार्यकारी अभियंता विनोद बागुल, बुटले महाविद्यालय प्राचार्य अरविंद लाडोळे, माजी उपप्राचार्य प्रा. सुधीर पाठक, प्रा. प्रवीण चांडक, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी प्रमोद सूर्यवंशी, केंद्रप्रमुख किरण बारशे, सेवानिवृत्त वन अधिकारी बशीर शेख, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष पी पी पप्पुवाले, पत्रकार रफिक शेख, अजित महिन्द्रे, सदाशिव कांबळे, अनुराग मिश्रा, घंटी बाबा मंदिर संस्थानचे गोपाल शहा, मराठा सेवा संघाचे तोमरेश्वर ठाकरे, गजानन पाटील, जिजाऊ ब्रिगेड तालुकाध्यक्ष शुभदा पाटील, शिक्षक पतसंस्थचे संचालक सुजित ठाकरे, एकनाथ मोगल, धन्नू मस्के, राजू ढोके, श्याम विणकरे, सलीम नौरंगाबादे, मधुकर डाखोरे, शीतील सोनुलकर, अमीन नौरंगाबादे, साहेबराव राठोड, ॲड प्रवीण ढाले, दिवाकर इहरे, अमित चिद्दरवार, शारीरिक शिक्षक संघटना तालुका संयोजक सुरेंद्र राठोड या मान्यवरांनी डॉ कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करुन आदरांजली वाहिली. या सर्वांनी ''स्वप्न तेच जे तुम्हाला झोपू देत नाही'' या कलाम यांच्या अजरामर विचारांना उजाळा देत, त्यांच्या



कार्याचे आणि योगदानाचे स्मरण केले.

डॉ. कलाम यांचे संपूर्ण आयुष्य देशभक्ती, विज्ञान, शिक्षण आणि नवउत्साह यांना समर्पित होते. त्यांच्या स्वप्नातला भारत एक विकसित महासत्ता आजही अनेकांच्या प्रेरणेचा स्रोत आहे. त्यांचे विचार आणि मूल्यं नव्या पिढीला मार्गदर्शन करत राहतील, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम फोरम, दिग्रस यांनी केले. फोरमचे अध्यक्ष फिरोज खान, उपाध्यक्ष हाजी अजीम खान, हाजी करीम शेख, सचिव आमीन चौहान, कार्याध्यक्ष नासीर मिर्जा, इरफान खान, अमीन नौरंगाबादे, मोहम्मद परसुवाले, फैयाज शेख, फारुक चव्हाण, अजीम शेख, सोनू शेख, आशिष अगलदरे, आसिफ काजी, सादिक गारवे, आसिफ शेख, जुनेद शेख यांनी परिश्रम घेतले. पोलीस प्रशासन तसेच उपस्थित मान्यवरांचे विशेष आभार फोरमच्यावतीने मानण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### मनोज जरांगे पाटील यांचं शिष्टमंडळ मुंबईकडे रवाना



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** मनोज जरांगे पाटील यांचं मराठा आंदोलकांचं शिष्टमंडळ मुंबईकडे रवाना झालंय. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसह इतर मागण्यांसाठी २९ ऑगस्ट रोजी जरांगे मुंबईत आंदोलन सुरू करणार आहे. या आंदोलनाच्या पूर्व तयारीसाठी उद्या हे शिष्टमंडळ आझाद मैदानासह इतर मैदानाची पाहणी करणार आहे. दरम्यान मुंबईकडे शिष्ट मंडळ रवाना होण्याआधी जरांगे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. मुंबईत भूतो न भविष्यती असं आंदोलन होणार असून आमच्या मागण्या पूर्ण करा जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत मुंबईतून माघारी फिरणार नाही असा ईशाइशारा जरांगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांना दिला आहे. मराठ्यांचा वाटेला जाऊ नका,आता अभ्यास ,गिभ्यास नाही, थेट आमच्या मागण्यांची अंमलबजावणी पाहिजे अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. मराठ्यांच्या डोक्यावर आंदोलनाचा गुलाल टाकणार म्हणजे टाकणार असा दावाही जरांगे यांनी केलाय.

### पतीकडून पत्नीच्या डोक्यात फरशी घालून खून; दक्षिण सोलापूर तालुक्यात घरगुती वादावरुन दुर्दैवी घटना

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** घरगुती वादातून पतीकडून पत्नीच्या डोक्यात फरशी घालून खून केल्याची दुर्दैवी घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर ते आनंदनगर परिसरातील शेतात २७ जुलै रोजी उघडकीस आली. गौराबाई नीलकंठ पाटील असं मृत झालेल्या पत्नीचे नाव तर नीलकंठ भीमराव पाटील असे फरशी घालणाऱ्या पतीचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार तू शेतात न येणारी आज कशी आली असा जाब विचारत पतीचा पत्नी बरोबर वाद झाला. त्यानंतर रागाच्या भरात पतीने डोक्यात फरशी घालून पत्नीचा खून केला. गौराबाई आणि नीलकंठ यांना दोन विवाहित मुले, एक मुलगा बेंगलोर येथे कामाला तर दुसरा गावातच काम करतो.गौराबाई काही दिवस मुलाकडे राहत होत्या, गावाला जाणे येण्याच्या कारणावरून आणि सांभाळत नसल्याने पती-पत्नीत वाद होत होता. अशा घरगुती वादातून पतीकडून पत्नीच्या डोक्यात फरशी घालून खून केल्याची दुर्दैवी घटना घडली असून पती विरोधात विजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अशी माहिती विजापूर नाका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादासाहेब गायकवाड यांनी दिली.

### परतुरमध्ये चिखलातच भरला आठवडी बाजार, नगर परिषदेकडून स्वच्छता होत नसल्याने नागरिकांचा संताप





दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यातील परतुरच्या आठवडी बाजारात भाजीपाला विक्रेत्यांना चिखलातच बसून भाजीपाला विक्री करण्याची वेळ आलीय. बाजार गल्लीत ओटे बांधलेले नसल्याने भाजीपाला विक्रेत्यांनी पावसामुळे झालेल्या चिखलात बसून भाज्यांची विक्री केली. या प्रकारामुळे बाजार करण्यासाठी आलेल्या ग्राहक आणि भाजीपाला विक्रेत्यांमध्ये संताप पाहायला मिळाला. विशेष म्हणजे परतूर नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभारामुळे या भागात नियमित स्वच्छता होत नसल्याने भाजीपाला विक्रेत्यांना देखील चिखलात बसूनच भाजीपाल्याची विक्री करावी लागली, या प्रकारामुळे नगर परिषदेच्या विरोधात संतापाची लाट पाहायला मिळाली.

# कोण देव, कोण दानव हे लोक ठरवतात : आ. विजय वडेट्टीवार

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राजपुरोहित हा अर्गळीत पडलेला माणूस आहे. मेन स्ट्रीममध्ये येण्यासाठी पुरोहित यांचे प्रयत्न सुरू आहे. पुन्हा एकदा अध्याय लिहा. हा बालिशपणा सुरू आहे. खेळ खंडोबा सुरू आहे. राजकारणात धर्म आणायचे. लोक ठरवतात कोण देव आहे कोण दानव आहे. हे जनता ठरवेल. असे मत काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

एकनाथ खडसे रेव्ह पार्टी जावई. मी पाहिले नाही. बघितलं नाही. वाचलं नाही, त्यावर अधिक बोलणे हे उचित होणार नाही. कोणी सरकारला निकम म्हणते. कोणी भिकारी म्हणते. सरकारला टीका करत आहेत. देश कोणता पातळीवर आहे या संदर्भातील खरं वास्तविकता आता समोर येत आहे. जर सरकारची सच्चाई गडकरी लोकांसमोर पुढे आणत आहे. तर, त्यांना धन्यवाद म्हटले पाहिजे.

गडकरी नेहमी सच्चाई ची गोष्ट करतात ते केंद्र सरकार संदर्भात असो किंवा मग राज्य सरकार संदर्भात असो. सरकारची खरी परिस्थिती अशी लोक जर सामोर आणत असतील तर त्यांचे आभार मानले पाहिजे. चांगले झाले हजार पुरुष भेटले की कुठल्या कॅटेगिरीची आहे. हे बघावं लागेल. मतासाठी हे सरकार बरबाद करून ठेवल आहे. मत मिळवण्यासाठी ही योजना आणली आहे. आणखी शोधले तर खूप मिळतील. लोकांनी यांना हरवलं होतं ही योजना आणून मत मिळवण्याच्या प्रयत्न या सरकारने केलं. त्यांनी योजना आणली त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

शनि देवाकडे जा पाप करा, शेतकऱ्यांचे काम नका करू, शेतकऱ्यांना भिकारी म्हणा. वरून अंगलट आलं की शनिदेवाचे सर्व दरवाजे उघडे आहेत शनिशिंगणापूरला कोणी दरवाजेही लावत नाही. नोटाची बॅग ठेवणारे हे सरकार आहे. साडेसाती लागली आहे ते पुन्हा वाढलेली आहे.. कोकाटे मंत्रीपदापासून दूर जाणार नाही तेव्हापर्यंत शनिदेव त्यांच्या पाठीमागे हात धुवून पाठीमागे लागेल. शनिदेव पाठीमागे लागावे अशी मी शनि देवाकडे प्रार्थना करतो. आम्ही काळे कपडे घालतो मात्र यांचे काळे तोंड पोहोचू दे अशी प्रार्थना करतो. साधू संत ईश्वर यांचे नाव हे सरकार घेत. मनात नाही भाव देवा मला पाव. अजिबात त्यांच्या मनात देवाप्रती भावना नाही आहेत. नाही आहे.

मत मिळवण्यासाठी हा धंदा यांचा सुरू आहे. नवीन विषय पुन्हा काढतील भारत पाकिस्तान. टोकाची भूमिका घेऊन काँग्रेसवर हे टीका करीत होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान फक्त या सरकारला छाती फाडण्याचीच राहिली होती एवढा अभीर भाव ही सरकार सांगत होती. अशा ढोंगी लोकांपासून ढोंगी सरकारपासून लोकांनी सावध राहायला पाहिजे.

हसन मुश्रीफ यांनी अगोदर या सरकारमधून बाहेर पडावं आणि



मुख्यमंत्री करावे म्हणून उपोषणाला बसावं महाराष्ट्रातील जनता त्यांच्या पाठीमागे राहील व त्यांना समर्थन करेल. राष्ट्रवादी पक्षाला सत्ता हवी आहे ते सत्तेच्या शिवाय बाहेर राहू शकत नाही. जसा मासा पाण्याशिवा जगू राहू शकत नाही.तशी परिस्थिती राष्ट्रवादी काँग्रेसची आहे. भांडतील लढतील मात्र सत्तेत राहतील जसा गळाला मासे लागतात तसे हे सत्तेला चिपकून राहतील.त्यांचा राजीनामा काय झाला यासंदर्भात सर्व लोक अचंबित आहे. काही गोष्ट त्यांनी शेतकऱ्यांसंदर्भात चांगल्या मांडल्या होत्या. खरी गोष्ट काय आहे या संदर्भात समोर यायची आहे. या देशात लोकशाही नाही आहे. उपराष्ट्रपतीचा राजीनामा घेतला गेलेला आहे. असं मला वाटते. सरकारच्या विरोधात कोणी व्यक्ती सरकारमधील बोलला त्याला सरकार मधून बाहेर काढले जाते. दोन लोकांनाच सत्ता भोगायची आहे.

भाजपने सर्व पक्षांना सोबत घेतले ते सर्व पक्ष तसेच आहेत. देशाच्या इतिहास पुढे आणला तर वापराने सोडा अशी पद्धत आता पर्यंत राहिलेली आहे. सत्तेच्या ताटा मागे मांजरहून यांना येता काळात वागाव लागेल अशी सूचना भाजपने त्यांना केली आहे. सर्वोच्च न्यायच्या निकाल येऊ द्या. पक्षाच्या होण्याच्या निर्णयातील अंतिम संपूर्ण संदर्भाने दीड दोन वर्ष लागतोय हे. न्यायव्यवस्थेचे दुर्दैव आहे. निकाल उद्या न्यायालय काय म्हणतो त्यावर अधिक बोलता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर आता बोलता येणार नाही.अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक विद्याधर महाले पाटील यांनी सावरगाव तेलीतील तीनही धाडसी तरुणांचा केला सत्कार !

तरूणांच्या धाडसाने शेतकरी महिलेला जीवदानच मिळाले नाही तर तरूणांसमोर आदर्शही निर्माण केला - विद्याधर महाले पाटील



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

बिबी : नदीच्या पुलावरून पुराच्या वेगवान प्रवाहात वाहून जाणाऱ्या शेतकरी महिलेला तीन धाडसी व जीगरबाज तरूणांनी स्वतः चा जीव धोक्यात घालून मोठ्या शिताफीने वाचवले होते. काल (दि.२६) लोणार तालुक्यातील सावरगाव तेली येथे ही थरारक घटना घडली होती. शेतकरी महिलेला वाचविणाऱ्या उमेश सौदर, नीलेश गाडेकर व उमेश लांडगे या तीन जीगरबाज तरूणांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावतीने त्यांचे स्वीय सहाय्यक तथा मंत्रालयातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी विद्याधर महाले पाटील यांनी आज (दि.२८) चिखली येथील आपल्या निवासस्थानी हृदय सत्कार केला. तसेच, या तरूणांनी एका शेतकरी महिलेला वाचविलेच, पण त्यांच्या या धाडसाने इतर तरूणांसमोर आदर्शही प्रस्थापित केला, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. विद्याधर महाले पाटील यांच्या हृदय सत्काराने हे तीनही धाडसी तरुण चांगलेच भारावले होते. लोणार तालुक्यातील सावरगाव तेली परिसरात गेल्या चार दिवसांपासून संततधार व मुसळधार पाऊस कोसळत असून, नदी-नाल्यांना पूर आलेले आहेत. सावरगाव तेली येथील शेतकरी महिला यशोदा चव्हाण या शेतातून घरी परत येत असताना त्यांना गावाशेजारील तांडा वस्ती येथील छोट्या पुलावरून यावे लागले. परंतु, या पुलावरील नदीच्या पाण्यातून येत असताना अचानक मोठा पूर आला व या महिला पाण्यात वाहून जाऊ लागल्या. हे दृश्य पाहून गावातील उमेश सौदर, नीलेश गाडेकर व उमेश लांडगे या तीन तरूणांनी जीवाची अजिबात पर्वा न करता नदीच्या वेगवान प्रवाहात उड्या घेतल्या, व मोठ्या शिताफीने यशोदा चव्हाण या शेतकरी महिलेला वाचविले. या थरारक घटनेचे कालच ब्रेकिंग महाराष्ट्रने सविस्तर वृत्त प्रसारित करताच, त्याची तातडीने दखल घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक तथा मंत्रालयातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी विद्याधर महाले पाटील यांनी या तरूणांच्या धाडसाचे कौतुक केले. तसेच, आज सकाळी चिखली येथील निवासस्थानी या तीनही तरूणांचा हृदय सत्कार केला. या तरूणांनी दाखवलेले धाडस अतुलनीय असून, त्याच्यापासून इतर तरूणांनादेखील प्रेरणा मिळाली आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले, तसेच या तीनही तरूणांची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप ज्येष्ठ पत्रकार भगवान नागरे, ऋषी दंदाले यांचीदेखील प्रामुख्याने उपस्थिती होती.

सावरगाव तेली येथील नदीवरील पुल हा अतिशय लहान असून, त्याची उंची वाढविण्यात यावी, अशी विनंती याप्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे देवानंद सानप, पत्रकार भगवान नागरे व ऋषी दंदाले यांनी विद्याधर महाले पाटील यांच्याकडे केली. याप्रश्नी लवकरच आपण संबंधित विभागाला सूचना देऊ, अशी ग्वाहीही याप्रसंगी त्यांनी पत्रकारांना दिली

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली आत्महत्याग्रस्त शेतकरी स्वर्गीय गणेश थुट्टे यांच्या कुटंबीयांची सांत्वनपर भेट

टोकाची भूमिका घेऊ नका... शेतकऱ्यांना केले आवाहन





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज चिखली तालुक्यातील भरोसा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी दांपत्याच्या घरी सांत्वनपर भेट देऊन .. या शेतकरी कुटुंबीयांना धीर दिला. शेतकरी बांधवांनो टोकाची भूमिका घेऊ नका अस आवाहन त्यांनी यावेळी केल ... चिखली तालुक्यातील भरोसा येथील शेतकरी गणेश श्रीराम थुट्टे (वय ५५) आणि त्यांच्या पत्नी रंजना गणेश थुट्टे (वय ५०) यानी शेतकरी दांपत्याने गत आठवड्यात गळफास घेवून आत्महत्या केली या दांपत्याच्या आत्महत्येचं कारण हे हुमणी अळीचा प्रादुर्भाव शेतीतील पिकावर वाढल्याने पीक नष्ट झाली .त्यामुळे कर्जाचा बोजा वाढत असल्याने या शेतकरी दांपत्याने टोकाचे पाऊल उचल . या संदर्भाची माहिती केंद्रीयमंत्री तथा बुलडाणा लोकसभा मतदार संघाचे खासदार प्रतापराव जाधव यांना समजली . सध्या अधिवेशन सुरू असल्यामुळे ते शनिवारी मेहकर येथे घरी आलेले असतांना त्यांनी आज २७ जुलै रोजी रविवारला चिखली तालुक्यातील भरोसा येथे स्वर्गीय गणेश श्रीराम थुट्टे घरी जावुन सांत्वनपर भेट घेतली त्यांच्या कुटुंबीयांना धीर देत शासनातर्फे सर्वतोपरी मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली ... निसर्गाचा प्रकोप झाला तरीही शेतकऱ्यांनी खचून जावु नका.. सरकार तुमच्या पाठीशी आहे . असे टोकाचे पाऊल उचलू नका .. अस आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना केलं यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबुराव मोरे तालुकाप्रमुख गजानन मोरे संतोष भुतेकर राजू पाटील बाबुराव हाडे पंजाबराव जावळे अनमोल ढोरे विष्णू घुबे यांच्यासह अन्य पदाधिकारी ग्रामस्थ तसेच कृषी आणि महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते

# पॅन्थर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार यांचा हजारो अनुयायांसह खामगाव पोलीस स्थानकात ठिय्या

## दलित तरुणाला धर्म विचारत नग्न करून मारहान करणाऱ्या आरोपीना अटक करून मोका लावन्याच्या मागणीसाठी जमाव आक्रमक; उद्या दलित संघटनाचा खामगाव शहर बंद च आवाहन

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**खामगाव:** खामगाव शहरात रोहन पैठणकर या दलित तरुणाच अपहरण करून त्याला धर्म विचारत लग्न करून मारहाण करण्यात आली होती आज भीम आर्मीचे अध्यक्ष दीपक केदार व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष सचिन खरात यांनी या दलित तरुणाची अकोला येथील रुग्णालयात जाऊन भेट घेतली.





या तरुणाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती त्यांनी दिली त्यानंतर सचिन खरात यांनी खामगाव येथे येऊन अतिरिक्त पोलीस अधीक्षक व पोलीस उपअधीक्षक यांची भेट घेतली व दलित तरुणाला मारहाण करणाऱ्या सर्व आरोपींवर नको मोका व युएपीएनुसार कारवाई करण्यात यावी अशी मागणी करत खामगाव शहर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन सुरू केलं यावेळी हजारो आंबेडकरी अनुयायांच्या घोषणांनी परिसर दणाणून उठला यावेळी दीपक केदार यांनी पोलीस उपअधीक्षक व तपास अधिकारी असलेले अधिकाऱ्यांना चांगलंच धारेवर धरलं स्थानिक आमदारांचा तुमच्यावर दबाव आहे का तात्काळ कारवाई करणार आहेत का असे प्रश्न करत या आंदोलनाला सुरुवात सुरुवात केली आहे. उद्या खामगाव शहर बंदचा आवाहन यावेळी दलित संघटना यांनी केला आहे सध्या पोलीस स्थानक परिसरात मोठा जमाव जमलेला आहे.

# राज्य महामार्गावरील खड्ड्यात धानाची लागवड

## छत्रपती संभाजी नगर ते नागपूर राज्य महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य : युवकाने वेधले प्रशासनाचे लक्ष

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर ते नागपूर राज्य महामार्गावर डोणगाव जवळ प्रचंड मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे दर दिवशी दुचाकी वाहनास मोठ्या विहनांचा अपघात घडत आहेत. खड्ड्यांमुळे अनेकांना अपंगत्व आले आहे.मात्र, गेंड्याची कातडी असलेल्या प्रशासन याकडे लक्ष देण्यास तयार नसल्याने शासनाचे व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी एका युवकांने रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यात धान लागवड करून शासनाचा निषेध केला.प्रशासनाचा निषेध केला. या युवकाच्या या आगळ्या वेगळ्या आंदोलनाने शासन प्रशासनाचे लक्तरे विशीवर टांगल्या गेली आहेत.

डोणगाव येथून छत्रपती संभाजी नगर व नागपूर राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे.डोणगाव परिसर सदर रस्त्याचे





काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने परिसरात प्रचंड मोठे विविध खड्डे पडले आहेत.या खड्ड्यांमध्ये दुचाकी सह इतर मोठ्या वाहनांचे आदळून दर दिवशी अपघात घडत आहेत.

अनेकांना या खड्ड्यामुळे अपघात होऊन अपंगत्व आले आहे. महामार्गावरील खड्डे बुजवण्यासाठी वारंवार मागणी करण्यात आली.मात्र, शासन प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे परिणामी प्रवाशांना आपला जीव मोठे घेऊन प्रवास करावा लागत आहे. गत चार ते पाच दिवसापासून सुरू असलेल्या संततदार पावसाने खड्ड्यामध्ये पाणी साचून राहत आहे. त्यामुळे वाहनधारकाला खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने अनेक वाहने खड्ड्यांमध्ये जाऊन पडत अपघात घडत आहेत. महामार्गावरील खड्ड्यात दुचाकी आढळल्याने अनेकांना दुखापत झाली आहे. मात्र, निगरगट्टा प्रशासन लक्ष देण्यास तयार नसल्याने नागरिकांमध्ये शासन प्रशासनावरती तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजवावे यासाठी एक युवकाने महामार्गावरील खड्ड्यात धान लावून शासन प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्याचबरोबर महामार्गावरील दुचाकी धारक व इतर प्रवासी वर्गाकडून सदर खड्डे तात्काळ बुजवावे, अशी मागणी केली जात आहे.

### तात्काळ खड्डे वाजवा अन्यथा ठिय्या आंदोलन आंदोलन



डोणगाव येथून छत्रपती संभाजी नगर ते नागपूर गेलेल्या महामार्गावर पडले गेलेल्या महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजवावे व नागरिकांना होणारा त्रास दूर करावा नागरिकांचा प्रवास सुखकर करावा व राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजविण्याबरोबरच प्रवाशांना इतर सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्या.अन्यथा विभाग कार्यालयाला समोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र स्वरूपाचे ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी इशारा दिला आहे.

# शाळेतील विद्यार्थ्यांनी जीव मुठीत धरून दोरीच्या साहाय्याने पूल ओलांडला

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यात सर्वत्र काल दमदार पाऊस झाला. या पावसाने अनेक ठिकाणचे नदी-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. तर याचाच फटका विद्यार्थ्यांना देखील बसल्याचा समोर आले आहे. बीडच्या गेवराई तालुक्यातील कट चिंचोली येथील विद्यार्थी ४ किमी अंतर पार करून दैठण गावातील शाळेत जातात. मात्र, रस्त्याचे काम अर्धवट झाल्याने पूल बांधलेला नसल्याने रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागले. यामुळे बस किंवा कुठलीही गाडी पुढे जाऊ शकत नव्हती. यामुळे बराच वेळ विद्यार्थी अडकून पडले होते. यानंतर शिक्षक आणि काही ग्रामस्थांनी मिळून दोरीच्या साह्याने सर्व विद्यार्थ्यांना सुखरूप दुसऱ्या बाजूला काढून देत घरापर्यंत पोहचवले आहेत. दरम्यान, यामुळे विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांनी सुटकेचा विश्वास सोडला असून रस्त्याचं काम करणाऱ्या ठेकेदाराने तात्काळ पूल करावा, अशी केली आहे.



# जाजू इंटरनॅशनल स्कूलमध्ये भव्य इन्व्हेस्टिचर समारंभ संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** जाजू इंटरनॅशनल स्कूलमध्ये दिनांक २६ जुलै २०२५ रोजी शालेय सभागृहात भव्य इन्व्हेस्टिचर समारंभ उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दीपमाला भेंडे (पोलीस निरीक्षक, भरोसा सेल), शुभांगी गुल्हाणे (जनसंपर्क अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय), माधुरी उमबरकर (पोलीस निरीक्षक, कंट्रोल रूम), संतोष मनवर (सहाय्यक पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा), अभयकुमार गुप्ता (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रीय सैनिक संस्थान तसेच सेवा निवृत्त इंडियन आर्मी, यवतमाळ), राजेश कोडापे (ज्येष्ठ अधिवक्ता, यवतमाळ जिल्हा न्यायालय) यांची उपस्थिती होती.



तसेच हरिकिशन जाजू एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष प्रकाश जाजू, पूनम जाजू सचिव आशिष जाजू, संस्थांचे कोषाध्यक्ष अध्यक्ष तसेच डायरेक्टर प्रिंसिपल जाजू इंटरनॅशनल स्कूल शिल्पा जाजू आणि शाळेच्या समन्वयक सुचिता पारेख या कार्यक्रमाच्या काही दिवस आधी शाळेत इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने विद्यार्थी परिषदेची निवडणूक घेण्यात आली होती. त्यातून निवडून आलेल्या सदस्यांना समारंभात सॅश व बॅचेस प्रदान करून शपथविधी घेण्यात आला. हेड बॉय म्हणून वीर बेलोर्कर, हेड गर्ल म्हणून गुंजन अग्रवाल, डेप्युटी हेड बॉय वेद तेलेवार, डेप्युटी हेड गर्ल लब्धी कोठारी यांनी शपथ घेतली.

स्पोर्ट्स कॅप्टन बॉय रिदंत खारकर, स्पोर्ट्स कॅप्टन गर्ल प्रबलीन पाबला यांनी जबाबदारी स्वीकारली. हाउस मॅनेजर अँडीज म्हणून निर्भया मनवर, आल्प्स परिधी अकोलकर, रॉकीज साची काबरा, हिमालय विश्वजा चौधरी यांनी शपथ घेतली. को-हाउस मॅनेजर म्हणून अँडीज पार्थ बंग, आल्प्स ओजस्वी देशमुख, रॉकीज प्रिशा बंग आणि हिमालय अनय दुदुलवार यांनी कार्यभार स्विकारला. मान्यवरांनी मुलांना मार्गदर्शन करत एक उत्तम व्यक्ती तसेच देशाचे लीडर बनून प्रतिनिधित्व करा असे आव्हान केले

या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी गीत व नृत्य सादरीकरण करून समारंभाला रंगत आणली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन दीपाली रावेकर, अरुष अग्रवाल आणि सकीना बॉम्बेवाल यांनी केले.

समारंभ यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# पिक विमा भरण्याकडे शेतकऱ्यांनी फिरवली पाठ

## पहीले तीन ट्रीगर रद्द केल्यामुळे पिक नुकसानभरपाई भेटते कि नाही याबद्दल शंका

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना:** दरवर्षी जून महिन्यात पेरणीची लगबग संपली की शेतकरी बांधवांची आपल्या पिकाचा विमा उतरवण्यासाठी पळापळ असते मागील वर्षी एक रुपयात पिक विमा असल्यामुळे शेतकरी बांधवांनी आपल्या संपूर्ण शेताचा खरीप व रब्बी दोन्ही हंगामाचा पिक विमा मोठ्या प्रमाणात उतरला होता परंतु यावर्षी म्हणजे २०२५ २६ आली शासनाने शासनाचे पीक विम्याचे चार ट्रिगर रद्द करून उत्पन्नावर आधारित पिक विमा मिळणार असल्यामुळे आणि यावर्षी पिक विमा भरण्यासाठी पैसे लागणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी पिक विमा भरण्याकडे पाठ फिरवल्याचे दिसते लोणार तालुक्यात मागील वर्षी खरीप २०२४ मध्ये६३६४४एवढे पिक विमा कंपनीला अर्ज प्राप्त झाले होते तर या चालू वर्षी २०२५मधे दिनांक २७जुलै पर्यंत फक्त २०३९३ अर्ज प्राप्त झाले आहेत हे प्रमाण मागील वर्षीपेक्षा फक्त २५टक्के झाले असुन खुपच कमी आहे.

शासनाने ज्या ट्रीगरमधुन जास्त नुकसानभरपाई भेटते ते पहीले तीन ट्रीगरच रद्द केले आणि उत्पन्नावर आधारित पिक नुकसानभरपाई भेटणार असे सांगितले त्यामुळे पिक विम्याची नुकसानभरपाई भेटते कि नाही यामध्ये शंका आहे

**-रमेश हरीभाऊ नागरे**
**शेतकरी महार चिकना**

मागील वर्षी एक रूपयात पिक विमा होता त्यामुळे शेतकऱ्यांची पिक विमा भरण्यासाठी केंद्रांवर शेतकरी बांधवांची गर्दी राहायची परंतु या वर्षी पैसे भरावे लागत असल्याने शेतकरी पिक विमा भरण्याकडे कानाडोळा करत आहेत

**दिपक घुगे**
**सि एस सि**
**केंन्द्रचालक ,**
**महारचिकना**

पीक पेरणी पासून काढणीपर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणामुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळासाठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळामधील त्या पिकांचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना सम प्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे त्यामुळे जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचा विमा भरून घ्यावा.

**-सचिन पेवकर तालुका व्यवस्थापक**
**भारतीय कृषी विमा कंपनी लोणार**

# कारगिल युद्धात भारतीय सैनिकांनी दाखवलेले शौर्य हे आजच्या तरुण पिढीसाठी कायम प्रेरणादायी : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस

## २६ वा कारगिल विजय दिवस उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

वाशीम : २६ जुलै १९९९... भारतीय सैन्याच्या शौर्याचा, त्यागाचा आणि पराक्रमाचा तो सुवर्णदिन ! कारगिलच्या पर्वतरांगांमध्ये, प्राणांची बाजी लावत आपल्या मातृभूमीसाठी लढलेल्या वीर जवानांनी हा विजय इतिहासात कोरून ठेवला. या दिवशी आपण केवळ एक युद्ध जिंकलं नाही, तर जगाला दाखवून दिलं की भारताच्या सैनिकांमध्ये हिमालयासारखा धैर्यगौरव आहे. कारगिल विजय दिन म्हणजे स्मरण, सन्मान आणि संकल्प यांचा संगम. शत्रूंच्या छाताडावर तिरंगा फडकवणाऱ्या त्या रणधुरंधरांना मानाचा मुजरा करण्याचा दिवस. त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात देशभक्ती होती, शौर्य होतं, आणि आपण सर्वांनी त्यांचं ऋण कायमच मान्य केलं पाहिजे. आजचा दिवस म्हणजे वीर जवानांच्या अमर स्मृतींना उजाळा देण्याचा, त्यांच्या शौर्यकथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा आणि देशासाठी काहीतरी करण्याचा निर्धार पुन्हा एकदा जागवण्याचा दिवस आहे.

कारगिल युद्धात भारतीय सैनिकांनी दाखवलेले शौर्य हे आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या शूरवीरांना सदैव स्मरणात ठेवावे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी उपस्थित माजी सैनिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, माजी सैनिकांनी जमीन विषयक कोणतीही अडचण असल्यास ती प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावी. प्रत्येक सोमवारी तहसील कार्यालयात वत्सगुल्म शेतीसंवाद १२ ते १ या वेळेत घेतला जातो. या माध्यमातून माजी सैनिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील.

जिल्हा प्रशासन माजी सैनिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी कटीबद्ध आहे आणि त्यांची सेवा, त्याग सदैव स्मरणात



ठेवली जाईल.असे जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी यावेळी सांगितले.

शहीद सैनिकांच्या बलिदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येतो.या दिवसाच्या सन्मानार्थ आजचा २६ वा कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शहीदांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांच्याहस्ते भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी आकाश वर्मा,निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विश्वनाथ घुगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीमती बुवनेश्वरी एस यांनी उपस्थित वीर पत्नी शांताबाई सरकटे, पार्वतीबाई लहाने, मिराबाई नागुलकर, शोभाबाई भालेराव यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.माजी सैनिकांनी कारगिल युद्धाच्या आठवणी व अनुभव व्यक्त केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत माजी सैनिकांशी संवाद साधला. त्यांनी माजी सैनिकांना आवाहन केले की, जिल्हा सैनिक कल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. ते पुढे म्हणाले की, जिल्हा सैनिक कार्यालयाने माजी सैनिकांच्या नोंदीचे कामकाज ऑनलाईन स्वरूपात पूर्ण करावे. अभिलेखांचे डिजिटायझेशन करून दस्तऐवज व्यवस्थित साठवावेत. माजी सैनिकांच्या विविध मागण्यांचे प्रस्ताव प्रशासनाकडे सादर करावेत. आम्ही त्याचा शासनदरबारी पाठपुरावा करू.असेही सांगितले

कार्यक्रमाला जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे कल्याण संघटक संजय यलमर, वरिष्ठ लिपिक शिवशंकर झाडोकार, लिपिक माणिक इंगळे, रविंद्र डोंगरदिवे यांच्यासह माजी सैनिक, शहीद सैनिकांच्या वीर पत्नी आदी उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### घराभोवती करंट देऊन कुटूंब संपविण्याचा कट, एक महिला ठार



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** राजकीय वैमनस्यातून वचपा काढण्यासाठी चक्क विरोधकांच्या घराभोवती रात्री दरम्यान तारा बांधून त्यात वीज प्रवाह सोडण्यात आला. यात एक ३७ वर्षीय महिलेचा विजेच्या धक्क्याने जागी मृत्यू झाला तर तिचा पती यात जखमी झाला ही घटना यवतमाळच्या घाटंजी पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या अंजी नाईक येथे उघडकीस आली असून गावात दगंल नियंत्रण पथक आणि पोलिस कर्मचाऱ्यांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे. सविता पवार असे करंट लागून मृत महिलेचे नाव आहे. तर मनेश पवार असे जखमी झालेल्या मृतक महिलेच्या पतीचे नाव आहे. दरम्यान या प्रकरणी सहा संशयित जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून दोघांना घाटंजी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### साक्री तालुक्यात वाघाचा धुमाकूळ; पोल्ट्री फार्ममध्ये शिरून कोंबड्या केल्या फस्त




दैनिक आपला विदर्भ



**धुळे/प्रतिनिधी :** साक्री तालुक्यातील बल्हाणे शिवारात एका पट्टेदार वाघाने धुमाकूळ घालत चेतन भीमराव बिरारीस यांच्या पोल्ट्री फार्ममध्ये शिरून ५० हून अधिक कोंबड्या फस्त केल्याची घटना घडली आहे. सुदैवाने, पोल्ट्री फार्ममध्येच झोपलेले रखवालदार आणि त्यांचे कुटुंबीय प्रसंगावधान राखून तात्काळ एक खोलीत गेल्याने थोडक्यात बचावले. घटनेची माहिती मिळताच पिंपळनेर वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

वनविभागाचे अधिकारी आणि पथक घटनास्थळी दाखल होत त्यांनी पंचनामा केला असून, प्रथमदर्शनी नागरिकांनी तो पांढऱ्या पट्टेदार वाघासारखा असल्याचे सांगितले. या घटनेमुळे पोल्ट्री मालक चेतन बिरारीस आणि अविनाश पाटील यांच्यासह स्थानिक शेतकरी घटनास्थळी दाखल झाले होते. काही दिवसांपूर्वीच या परिसरात पट्टेदार वाघ दिसल्याचे स्थानिक शेतकरी आणि गावकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आज पुन्हा वाघाचा संचार झाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने या वाघाचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### शहरातील रस्त्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी मनसेची अनोखी बॅनरबाजी

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड शहरातील अंतर्गत रस्त्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने बीड शहरात अनोखी आणि लक्षवेधी बॅनर बाजी केली आहे. या अनोख्या बॅनरबाजीची चांगलीच चर्चा होऊ लागलीय. बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि बांधकाम विभाग अधिकारी हरवले आहेत. या आशयाचे बॅनर शहरभरात लक्ष वेधून घेत आहेत. शोधून देणाऱ्यास १०१ रुपयांचे बक्षीस मनसेने जाहीर केले आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना बाजार रस्त्याची दुरावस्था झाली. अनेकदा निवेदन मागणी करून देखील रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत नाही. त्यामुळे मनसेने ही अनोखी बॅनरबाजी केली आहे.

